**प्रेसनोट** दि. 04/12/2025

**ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणेकडून निगुडघर मंडळ,ता.भोर येथील मंडलाधिकारी यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे** |
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | भोर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन 1988 चे कलमान्वये. |
| **तक्रारदार** | पुरूष, वय 23 वर्ष, धंदा व्यापार |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | रूपाली अरुण गायकवाड, वय-40 वर्षे, मंडळ अधिकारी, निगुडघर मंडळ,ता.भोर जि.पुणे.रा.ठी.14, संघवी लक्ष्मी विलास, वेताळ पेठ, नवीन कोर्टाजवळ भोर, जिल्हा पुणे. (वर्ग :- 3) |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | **रू. 1,50,000/- (एक लाख पन्नास हजार रूपये)** |
| **पडताळणी दरम्यान लाच मागणी** | **रू. 1,00,000/- (एक लाख रूपये)** |
| **स्वीकारलेली लाच रक्कम** | **रू. 1,00,000/- (एक लाख रूपये)** |
| **पडताळणी दिनांक** | दि. 04/12/2025 |
| **सापळा दिनांक** | दि. 04/12/2025 |
| **ठिकाण** | अभिजीत मंगल कार्यालयाचे जवळ भोरेश्वर नगर रोड,पीराचा माळ,भोर, येथे रोडवर |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. सुहास हट्टेकर, पोलीस निरीक्षक, ला प्र वि,पुणे. (मो.क्र. 9881873330) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. अविनाश घरबुडे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि, पुणे (मो.क्र. 9860667770) |

**थोडक्यात माहिती :-**

यातील तक्रारदार यांनी तहसीलदार भोर यांच्याकडून दी.19/11/2025 ते 10/12/2025 रोजी पर्यंतच्या कालावधीसाठीचा 200 ब्रास माती वाहतुकीचा परवाना घेतला आहे. त्यासाठी त्यांनी 1,26,230/- रुपये रॉयल्टी च्या स्वरूपात भोर तहसील कार्यालयात भरले आहेत. तक्रारदार हे ज्या भागातून माती उचलत आहेत त्या मंडळाच्या मंडळ अधिकारी यातील आरोपी लोकसेवक श्रीमती रूपाली गायकवाड यांनी दि. 30/11/2025 रोजी तक्रारदार यांच्या परवान्यामध्ये नमूद असलेल्या गाड्यांमधून माती वाहतुक करीत असताना त्या गाड्या अडवून इथून पुढे मातीच्या गाड्या चालू ठेवण्याकरिता व तक्रारदार करीत असलेल्या माती वाहतुकीच्या व्यवसायास सहकार्य करण्याकरिता त्यांनी तक्रारदाराकडे 1,50,000/- रुपयाच्या लाचेची मागणी करून जोपर्यंत पैसे देणार नाही तोपर्यंत माती वाहतूक बंद ठेवायची अशी धमकी देऊन पकडलेल्या गाड्या सोडून दिल्या. त्यानंतर आरोपी लोकसेवक या तक्रारदारास वारंवार त्यांच्या कार्यालयात भेटण्याकरीता बोलवत असल्याची तक्रार तक्रारदार यांनी दिनांक 3/12/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे दिली होती.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने आज दि.4/12/2025 रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता यातील लोकसेविका रुपाली गायकवाड यांनी तक्रारदारास भोर शहराच्या बाहेर अभिजीत मंगल कार्यालय भोर येथे बोलावून तक्रारदार कायदेशीररित्या माती वाहतूक करत असलेल्या व्यवसायाला यापुढे सहकार्य करण्यासाठी तक्रारदाराकडे 1,00,000/- रुपयाच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

वरीलप्रमाणे पडताळणी झाल्यानंतर आज रोजी 4/12/25 रोजी 17:03 वा. अभिजीत मंगल कार्यालयाचे जवळ भोरेश्वर नगर रोड पीराचा माळ,भोर, येथे रोडवर लोकसेविका रुपाली गायकवाड,मंडळ अधिकारी,निगुडघर यांनी तक्रारदार यांचेकडून 1,00,000 रुपयाची लाच पंचासमक्ष स्वीकारली असता रंगेहाथ पकडण्यात आले आहे. त्यांच्याविरुद्ध भोर पोलीस स्टेशन ठाण्यामध्ये भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.

1) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक -020-26122134, 26132802, 26050423, 9403781064
2) व्हॉट्स-ॲप क्रमांक - 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
4) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
5) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in



दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.